# दि महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनेल वेल्फेअर असोसिएशन मुंबई

नोंदणी क्र. : ई ५८८८ मुंबई सन १९७५

दिनांक १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई गोदीत एस.एस. फोर्ट स्टिकिन या जहाजाला स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीशी झुंज देताना अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौत्याम्य झाले.

त्याचप्रमाणे १८ ऑक्टोबर २००९ रोजी ठाणे येथील तारांगण सोसायटी या उंच इमारतीमध्ये अग्निशमनाचे जवान काम करीत असताना ठाणे महापालिकेचे ६ जवानांना हौत्याम्य झाले. तसेच यापुर्वी देखिल अग्निशमनाचे कार्य करताना प्राणांची आहुती देणाऱ्या अग्निशमन सेवेतील अधिकारी /कर्मचारी यांच्या त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रतीवर्षी केंद्रीय गृह मंत्रालय नवी दिल्ली यांच्या सुचनेनुसार संपूर्ण देशात १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो.

अशा प्रकारचे कार्य करीत असताना हौत्याम्य प्राप्त जवानांना आपणासारख्या अनेक सहृदयी व्यक्तीकडून मदतीचा हात पुढे आलेला आहे व यापुढेही येणार आहे. अशाच प्रकारची संकल्पना समोर ठेऊन दि महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनेल वेल्फेअर असोसिएशन मुंबई या नावाने एक असोसिएशन आहे. यामध्ये अग्निशमन कर्मचाऱ्यांकरीता "कल्याण निधी" उभारण्यांत येत असतो.

या असोसिएशनला देण्यात येणारे डोनेशन हे आयकर अधिनियम १९६१ च्या सेक्शन ८० जी अंतर्गत आयकर मुक्त आहे.

हा कल्याण निधी या वेल्फेअर असोसिएशनचे सभासद असलेल्या राज्यातील अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी वैद्यकीय/आर्थिक मदत तसेच त्यांच्या गुणवंत मुलांना शिष्यवृत्ती अशा विविध कल्याणकारी योजनासाठी वापरण्यात येतो.

अशा प्रकारच्या प्रेरणेने प्रेरीत होऊन या विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या कल्याणासाठी प्रथमच एक राज्यव्यापी कार्यक्रम डोंबिवली नगरीत आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम दि. ४ जानेवारी व ५ जानेवारी २०१० रोजी संपन्न होणार आहे.

दिनांक ४ जानेवारीच्या कार्यक्रमामध्ये अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांकरीता विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात येणार आहेत. व ५ जानेवारी २०१० रोजी सायंकाळी एक संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या संगीत रजनीच्या कार्यक्रमाच्या तिकीट विक्रीतुन आणि जाहिरातीतून वेल्फेअर असोसिएशन करीता "कल्याण निधी"उभारण्यात येणार आहे. या करीता आपणा सर्वाचा हातभार या कार्यक्रमाकरीता आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे आपणांकडून या असोसिएशन करीता देणगी रुपाने मदत द्यावयाची असल्यास आपले स्वागत आहे. आपली मदत "दि महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनेल वेल्फेअर असोसिएशन" यांचे नावे काढलेल्या व मुंबईमध्ये देय होणाऱ्या डिमांड ड्राफ्ट / धनादेशाद्वारे आपल्या नजिकच्या कार्यक्षेत्रातील महापालिका / नगरपालिका अग्निशमन अधिकारी यांचेकडे सुपुर्द करावा.

आपली,

कार्यकारी समिती

दि महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस पर्सोनेल वेल्फेअर असोसिएशन मुंबई